मोटार अपघात दावा क्र.७२/२०२३

अर्जून वि. बालाजी व ईतर

नि.क्र.२८

**अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.३ ची जबानी**

**मी याद्वारे शपथेवर निवेदन करतो की,**

नाव- शेख फैयाज फकिरसाब

वय- ४५ वर्षे,

व्यवसाय- व्यवस्थापक,

राहणार- लातूर

**अर्जदारातर्फे सरतपासणी विधीज्ञ श्री. एम.एन.जाधव यांच्या वतीने**

१. मला न्यायालयाचे साक्षी समन्स प्राप्त झाले. मी सहयाद्री हॉस्पीटलमध्ये व्यवस्थापक म्हणून सन-२०१२ पासून काम करतो. मला बयान देण्यासाठी अधिकारपत्र देण्यात आले व त्या डॉ. किनीकर यांची सही आहे. तसेच त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२९** देण्यात येते. साक्षी समन्सप्रमाणे मी दस्त आणला आहे. अर्जदार हा आमच्या दवाखान्यात उपचारासाठी दि.२९.०५.२०२२ रोजी भरती झाला होता व त्याला दि.०२.०६.२०२२ रोजी सुट्टी देण्यात आली. त्यानुसार दवाखान्याचे बिल रू.४६,७००/- झाले होते व अर्जदारातर्फे सदरील रक्कम रोख भरण्यात आली. त्या बिलावर कर्मचारी श्री.मुकेश यांची सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. ते बिल **नि.क्र.३०** वर आहे. अर्जदाराचे एक्स-रे, सिटी स्कॅन व ईसीजी करण्यात आले होते. त्या सर्वांचे बिल रू.३७९०/- झाले असल्याबाबत पावत्या दाखल केल्या आहेत. त्या पावत्यावर कर्मचारी श्री.मुकेश यांची सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यांना एकत्रीतपणे **नि.क्र.३१** देण्यात येते.

**गैरअर्जदार क्र.२ तर्फे उलट तपास विधीज्ञ श्री.एस.एस.शिवपूरकर यांच्या वतीने**

२. आमच्या दवाखान्यात भरती झालेल्या रुग्णाचा दस्त तयार करण्यात येत असतो. त्याचे रजिस्टर मी सोबत आणले नाही. मी सोबत आणलेले सर्व बिल कॉम्प्यूटर जनरेटेड आहे परंतू, त्यासोबत नियमाप्रमाणे भारतीय साक्ष अधिनियमाचे प्रमाणपत्र दाखल केले नाही. सदरची माहिती संगणकामध्ये श्रीमती कौशिक यांनी

भरली होती परंतू त्या बिलावर त्यांच्या नावाची नोंद नाही. सर्व बिलावर पेड या नावाचा शिक्का मारलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की आम्हाला बिलाची रक्कम मिळाल्याचे खोटे सांगत आहे. मी दवाखान्याचे कॅशबूक सोबत आणले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे खोटी साक्ष देत आहे.

**गैरअर्जदार क्र.१ तर्फे उलट तपास विधीज्ञ श्री.एस.व्ही.बोराडे यांच्या वतीने**

३. पुकारले असता गैरहजर. उलट तपास नाही.

**उलट तपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

स्वाक्षरित/-
(साजिद आ. सैय्यद)
जिल्हा न्यायाधीश-४ व
सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
लातूर.

दि.०६.०७.२०२६